
UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९० • मार्च २०२२ पुरवणी विशेषांक





इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

Scanned with CamScanner

३९ महात्मा जोतीराव फुले यांचे कृषिविषयक विचार - डॉ.प्रदीप जगताप, सोलापूर ---------- १६१

४० डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारीतेचा चिकित्सक अभ्यास
- डॉ.जयपाल सावंत, कोरेगाव, जि.सातारा ---------------------------- १६५

४१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि योगदानः संक्षिप्त आढावा
- डॉ.अशोक कदम, माढा, जि.सोलापूर ---------------------------- १६९

४२ महात्मा फुलेंनी केलेली समाजक्रांती : एक ऐतिहासिक अध्ययन
- डॉ.प्रज्ञा कामडी, मोवाड, ता.नरखेड, जि.नागपूर ---------------------- १७३

४३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषी विचारांची प्रासंगिकता
- डॉ.अंकुश करपे, करमाळा, जि.सोलापूर ---------------------------- १७८

४४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक विचार
- डॉ.काशिनाथ तलंगे, गडहिंग्लज, जि.काल्हापूर ---------------------------- १८३

४५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धर्मविषयक भूमिका
- डॉ.डी.पी.खराडे, भिलवडी, जि.सांगली ---------------------------- १८८

४६ राज्य-समाजवादाबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार
- डॉ.पंडित लावंड, बार्शी, जि.सोलापूर ---------------------------- १९१

४७ स्त्री शिक्षणाचे कैवारी महात्मा फुले यांचे स्त्री शिक्षणाचे कार्य - डॉ.एम.एस.जडल, पंढरपूर --- १९४

४८ महात्मा फुलेंची वैचारिकता - डॉ.मोहन चव्हाण, सोलापूर ---------------------- २००

४९ महात्मा फुले यांचे साहित्य - एक अभ्यास
- १) प्रा.बजरंग मोरे, कोल्हापूर, २) प्रा.प्रकाश जमदाडे, दहिवडी, जि.सातारा. --------- २०३

५० डॉ. आंबेडकरांचे सत्ताकारण व शिक्षण यांच्या सहसंबधाचे विचार - प्रा.सचिन मोरे, अहमदनगर २०६

५१ म. फुले यांचे 'शेतकऱ्याचा असूड' ग्रंथातील शेतकरी वर्गाविषयीचे विचार
- प्रा.नील नागभिडे, उस्मानाबाद ---------------------------- २०९

५२ कामगारांचे भाग्यविधाते डॉ.बाबसाहेब आंबेडकर - प्रा.नारायण बनसोड, सोलापूर -------- २१४

५३ राष्ट्रपुरूष महात्मा जोतीराव फुले यांचे सामाजिक कार्य : विशेष संदर्भ तळेगाव ढमढेरे गाव -
- डॉ.पद्माकर गोरे, तळेगाव ढमढेरे, ता.शिरूर, जि.पुणे ---------------------- २१९

५४ महात्मा जोतिराव फुले यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार - प्रा.संगिता पैकेकरी, माढा, जि.सोलापूर २२३

५५ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही दृष्टिकोनाची समकालीन प्रस्तुतता -
- प्रा.पद्माकर पाटील, सोलापूर ---------------------------- २२६

५६ महात्मा फुले यांचे कृषी व उद्योगाविषयक विचार - प्रा.वनदास पुंड, कर्जत, जि.अ.नगर ----- २३१

५७ महिलांच्या सक्षमीकरणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान
- डॉ.अरविंद पुनवटकर, सावनेर ---------------------------- २३३

५८ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भटक्या विमुक्त जमाती विषयक दृष्टीकोण -
- प्रा.राजेश लोखंडे, कोरेगाव, जि.सातारा ---------------------------- २३७

५९ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार - प्रा.कैलास रोडगे, कर्जत, जि.अहमदनगर --- २४३

६० भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार - प्रा.रुपाली डिकोंडा, माढा, सोलापूर २४६




Scanned with CamScanner

 ISSN No. 2394-5990

# महात्मा फुले यांचे कृषी व उद्योगाविषयक विचार

प्रा.वनदास पांडुरंग पुंड
रयत शिक्षण संस्थेचे, दादा पाटील महाविद्यालय कर्जत.
Email- pundvandas@gmail.com

**प्रस्तावना :**

ज्योतीरावांचा जन्म एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात झाला. पेशवांना फुले पुरवण्याचा व्यवसाय घरात चालत असल्यामुळे त्यांना फुले नावानेच लोक ओळखू लागले. स्वतःला जेमतेम अक्षरओळख असलेल्या गोविंदरावांनी आपल्या मुलांना खूप शिकवायचे असा मानस केला. मात्र त्यांचा हा मानस पूर्णत्वास गेला नाही. मात्र त्यांच्यामध्ये शिक्षणाची ओढ त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. ऽराइट्स ऑफ मॅन' या पुस्तकाने ज्योतिराव खूप प्रभावित झाले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी सरकारी नोकरी करण्याचा निर्णय घेतला. भारतावर इंग्रजांची राजवट होती. या गुलामगिरीतून भारतीयांना मुक्त करण्याचा त्यांचा मनसुबा होता. हक्क वंचित घटकांच्या दुर्दशचे मुख्य कारण आहे हे ज्योतिरावांनी ओळखले म्हणून त्यांनी प्राथमिक शिक्षणावर अधिक भर द्यायचा असे निश्चित केले.

ज्योतिरावांना स्त्रीमुक्तीचा आद्य प्रवर्तक म्हटले जाते. स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक शोषण यांच्या विरोधात पहिला आवाज या देशात ज्योतिरावांनी उठवला होता. अनेक अनाथांचे ते आधार बनले होते. ज्योतीराव हे कृतीशील समाजसुधारक होते. ज्योतीरावांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. १८७३ मधे त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

१९७६ मधे पुणे नगरपालिकेचे सदस्य म्हणून नामांकन झाले. १८७७ च्या भीषण दुष्काळात त्यांनी ग्रामीण भागातील लोकांना मदत केली. झोपडपट्ट्यांच्या तसेच पुर्वास्पृशांच्या वस्तीत पाणीपुरवठा व्हावा, आरोग्य व शिक्षणाच्या सोयी व्हाव्यात यासाठी ज्योतिरावांनी प्रयत्न केले. हंटर आयोगाला ज्योतीरावांनी निक्षून सांगितले कि सरकारने स्वतः दलित शोषितांच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

ग्रामीण क्षेत्रात शिक्षणाचा प्रसार व्हावा, व्यवहार उपयोगी अभ्यासक्रम आखले जावेत आणि शिक्षण पूर्ण झाल्यावर शुद्रातीशुद्रांना अनुक्रमाने नोकऱ्या द्याव्यात, याकडे ज्योतिरावांनी सरकारचे लक्ष वेधले. जेव्हा पुणे नगरपालिकेचे भारताचे व्हाईसरॉय लॉर्ड लिटन यांच्या पुणे भेटीच्या प्रसंगी त्यांचे स्वागत करण्यासाठी शहर सजावटीचा निर्णय घेतला तेव्हा फक्त ज्योतिरावांनी विरोध केला.

**ज्योतिरावांचे शेतीविषयक विचार :**

ज्योतिराव हे प्रगतशील शेतकरी होते त्यामुळे त्यांनी शेतकरी आणि शेतमालाच्या दशेविषयी आग्रही भूमिका मांडली. शेतकऱ्यांना उत्पादन खर्च भरून येईल आणि किमान १५-२०% नफा मिळेल एवढी किंमत शेतकऱ्याच्या शेतमालाला मिळाली पाहिजे. शेतीसाठी पुरेसे पाणी बाराही महिने मिळाले पाहिजे व नळाद्वारे शेतीला पाणीपुरवठा केला गेला पाहिजे. शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकामध्ये शेतकरी सुखी होण्याचा त्रिसूत्री मूलमंत्र सांगितला आहे. त्यामध्ये ते म्हणतात कि शेतीला उत्पादन खर्चावर आधारित दार मिळाला पाहिजे, आणि शेतीव्यवसायाला पूरक जोडधंद्याची जोड दिली पाहिजे. ज्योतिरावांनी शेतीविकासाचे मॉडेल सांगितले, त्यामध्ये ते म्हणतात कि, व्यापारी पिके, कॅनलचे पाणी आणि आधुनिक पिक पद्धती शेतकऱ्यांनी अवलंबली पाहिजे. धरणे, विहरी, तलाव बांधले पाहिजे. नैसर्गिक खते आणि संकरीत बियाणांचा वापर शेतकऱ्यांनी केला पाहिजे. नळाद्वारे पाण्याचा पुरवठा करणे, शेतीला जोडधंदे, पूरक उद्योग यामाध्यमातून शेती कशी फायदेशीर होते याचा नकाशा त्यांनी प्रत्यक्ष मांडून दाखवला.

**ज्योतिरावांचे उद्योग विषयक विचार :**

ज्योतीराव हे पुणे कमर्शियल आणि कॉन्ट्रॅक्टींग कंपनीचे कार्यकारी संचालक होते. एक अव्वल दर्जाचे ते उद्योगपती होते. त्यांच्या या कंपनीचे कालवे, धरणे, बोगदे, पूल, कापडगिरण्या, रस्ते इ. कामे दर्जेदार केली. ज्योतिरावांच्या कंपनीने केलेली महत्वाची कामे म्हणजे कात्रजचा बोगदा, येरवड्याचा पूल आणि खडकवासला धरणाचा कालवा हि कामे आजही दर्जेदारपणाची साक्ष देतात.

ज्योतिराव हे राष्ट्रीय बिल्डर होते. त्यांच्या कंपनीचे भागीदार असलेले अनेक लोक बांधकाम क्षेत्रावर आपली मोहर उमटून गेले आहेत. मुंबई महानगरपालिकेची मुख्य इमारत, भायखळा पूल, मुंबईतील कापडगिरण्या, भंडारदरा जलाशय अशी अनेक कामे ज्योतिरावांच्या स्नेहाने केली. यातून मिळालेली रक्कम त्यांनी मुक्तहस्ते सामाजिक कामासाठी खर्च करून टाकली. ज्योतिरावांनी 'जातीभेद विवेकसार'



Department of Economics
Dada Patil Mahavidyalaya Karjat

Scanned with CamScanner

प्रकाशित केले. या कंपनीचे पुण्यात पुस्तकविक्री केंद्र होते. सोन्याचे दागिने बनविण्याचे साचे विकण्याची संपूर्ण मुंबई प्रांताची एजन्सी ज्योतिरावांकडे होती. हि कंपनी भाजीपाला विक्री व पुरवठा यांचेही काम करीत असे. सामाजिक कार्यकर्ता आणि यशस्वी उद्योगपती असा संगम ज्योतिरावांच्या बाबतीत होता. १५० वर्षापूर्वी कृषी-औद्योगिक शिक्षणाचा आग्रह धरणारे फुले हे आधुनिक भारताच्या कृषी-औद्योगिक प्रगतीचे शिल्पकार ठरतात. भारतातील कामगार चळवळीचे जनक नारायण मेधाजी लोखंडे यांचे प्रेरणास्थान ज्योतिराव होते. ज्योतिरावांनी शेयर मार्केटवर अनेक कविता लिहिलेल्या आहेत. त्यातून या धंद्यात काय खबरदारी घ्यावी लागते, हा धंदा करायला कोणकोणती कौशल्य असावीत या बाबीवर विचार व्यक्त केले आहेत. दारू विक्रीचे परवाने द्यायला त्यांचा विरोध होता. त्यातून वाचलेला पैसा शाळेवर खर्च करावा अस आग्रह ज्योतिरावांचा होता.

उद्योगामध्ये सचोटी आणि साध्यनसुचीता महत्वाची असते असा विचार फुल्यांनी मांडला. कवितेतून त्यांनी

सत्य उद्योगाने रोग लय जाती ।
प्रकृती होती बळकट ।
उल्हासित मन झटे उद्योगास ।
सुख सर्वत्रांस जोती म्हणे।

उद्योगाच्या बाबतीमध्ये फुल्यांना कोणत्याही प्रकारची हातचलाखी, अनीती मान्य नव्हती, हे सर्व माणसाला शेवटी धुळीस मिळवते. फुल्यांचा लॉटरी, जुगार, मटका यांना तीव्र विरोध होता, हे उद्योग म्हणजे खिसा कापण्याचे उद्योग आहेत. फुल्यांची स्वकष्टाने कमावलेल्या पैशावर श्रद्धा होती.

**सारांश :**

महात्मा फुले यांनी बहुजन समाजाच्या मानसिकतेचे समग्र परिवर्तन करण्यासाठी विचार मांडले. देवधर्म यावर विश्वास असलेल्या समाजाला विज्ञाननिष्ठ बनवण्याच्या प्रयत्न केला. समता, स्वातंत्र्य, बंधुत्व आणि न्याय यावर आधारित समाजरचना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या लेखनातून सत्यधर्म शोषणविरहित आणि सर्वचिकीत्सक समाजाची मानसिकता वाढवण्याचा दृष्टीने आपल्या लेखनातून प्रयत्न केला. शेतकरी सुखी तर सर्व जग सुखी त्याच बरोबर उद्योगांमध्ये आमलात आणावयाची तत्वे फुल्यांनी ठासून सांगण्याचा प्रयत्न केला.

**संदर्भ :**

१. भारतीय राजकीय विचारवंत -डॉ. भास्कर लक्ष्मन भोळे
२. राजकीय विचाराचा इतिहास - डॉ. ना. य. डोळे.
३. आधुनिक भारतीय राजकीय विचार संहिता आणि संदर्भ -विद्युत चक्रवर्ती, राजेंद्रकुमार पांडे
४. सत्यशोधक समाज साहित्य आणि विचार- डॉ. चं. वि. जोशी.



Scanned with CamScanner